CNR No.MHRG090002632024 **फौजदारी चौकशी अर्ज क्र.३४/२०२४**

सौ. वेदिका शिंदे व १

वि.

श्री. संदीप शिंदे व २

**<u>नि.क्र.०५ वरील आदेश</u>**

**<u>(दिनांक ०६/०३/२०२५ रोजी पारित)</u>**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम २३ अन्वये अंतरीम आदेशासाठी दाखल केला असून तिचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

०२. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांचा दिनांक २१.०२.२०२१ रोजी मौजे विरजोली, ता. रोहा येथे विवाह झाला. अर्जदाराचे आई–वडीलांनी अर्जदार हिस सोन्याचा हार – १.५ तोळे, सोन्याची नथ – १, सोन्याचे मंगळसुत्र – १.५ तोळे, कानातले – ५ ग्रॅम, चांदीचा कंबरपट्टा, चांदीची जोडवी, चांदीचे पैंजण तसेच सामनेवाला क्र.०१ या सोन्याची अंगठी – ६ ग्रॅम तसेच लग्नामध्ये आहेरामध्ये सामान, भांडीकुंडी, फर्निचर व कपडेलत्ते असे सर्व सामान दिले. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार हिस लग्नामध्ये सोन्याचे मंगळसुत्र – ३ तोळे, कानातले व अंगठी असे दागिने केले.

०३. अर्जदार क्र.०१ चे कथन असे की, अर्जदार क्र.०१ ही सामनेवाला क्र.०१ सोबत मौजे रातवड येथे नांदणेस गेली. सदर सामनेवाला यांच्या घरी सामनेवाला क्र.०१ तसेच त्यांची आई व वडील असे एकत्र रहात होते. सदर विवाहाचा सर्व खर्च अर्जदाराचे

आईवडीलांनी केला. विवाहानंतर साधारण ०२ महिने अर्जदाराबरोबर सोमलेवाले व्यवस्थित राहिले. अर्जदार ही विवाह झालेवर घरातील सर्व कामे करुन सामनेवाला क्र.०१ चे आईची सुश्रूषा करीत असे.

०४. त्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदार हिस भाड्याचे खोलीत वरसे येथे रहायला गेले. त्यानंतर भूवनेश्वर येथे सदनिका विकत घेवून तेथे रहायला गेले. अर्जदार हिची विवाहीत पत्नी म्हणून सामनेवाला क्र.०१ हे कोणत्याही प्रकारची जबाबदारी पार न पाडता अर्जदार क्र.०१ हिस मारहाण, शिवीगाळी करुन तिचा शारिरीक, मानसीक, भावनीक, आर्थिक हिंसाचार करुन छळजाच केला. त्यानंतर सामनेवाला यांनी सदनिका विकत घेणेसाठी अज्रदार हिचे आईवडीलांकडून पैसे व त्यांचे दागिने घेतले व त्यांचे अपरोक्ष सदर सदनीका विकून टाकली. तसेच मुलगा अयांश याचा जन्म झालेवर त्याचीसुद्धा कोणत्याही प्रकारे जबाबदारी पार न पाडता हेळसांड केली आहे.

०५. सामनेवाले यांनी अर्जदाराबरोबर फसवणूक करुन विवाह केला असून त्यानंतर सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार यांनी त्यांस घातलेले सोन्याची अंगठी तसेच अर्जदाराचे आईने सदनिका घेणेसाठी दिलेले तिचे सोन्याचे मंगळसूत्र व हार व रु.५०,०००/– व मेडीक्लेमचे रु.८०,०००/– घेतले असून त्यांस परत केले नाही. तसेच सामनेवाल्यांनी अर्जदार हिस घातलेले सोन्याचे मंगळसुत्र, कानातले व अंगठी असे सर्व दागिने त्यांच्याकडेच आहेत.

०६. सामनेवाला क्र.०१ हे अर्जदार व मुलाबरोबर कधीही व्यवस्थीत वागले नाहीत. अर्जदार व बाळाची पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र.०१ याची आहे. ती जबाबदारी पार पाडण्यास सामनेवाला क्र.०१ जाणूनबुजून टाळाटाळ करीत आहे. सामनेवाला क्र.०१ हा सुदर्शन कंपनीत सुप्रीया एंटरप्रायझेस् या कॉन्ट्रॅक्ट मध्ये सुपरवायझर असून त्याला दर महा रु.२५,०००/– इतका पगार आहे. तसेच किल्ला येथे अॅक्वाफिल्टरचे काम करीत असून त्याला त्या व्यवसायातून रु.२५,०००/– इतके उत्पन्न आहे. सबब सामनेवाला क्र.०१ यास दर महा रु.५०,०००/– इतके उत्पन्न असून रातवड येथे शेतजमीन मिळकतीमधून सुद्धा उत्पन्न आहे.

०७. अर्जदार क्र.०१ ला कोणतेही उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदरचा मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात सामनेवाला क्र.०१ याने दर महा रु.३०,०००/– उदरनिर्वाहाकरीता द्यावे ही विनंती केली आहे.

०८. सामनेवाला क्र.०१ स्वतः तसेच वकीलांमार्फत न्यायालयात हजर राहुन त्यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१८ नुसार दाखल केले. त्यांनी त्यांचा व अर्जदार क्र.०१ यांचा विवाह मान्य केला असून त्यांचे म्हणणे असे की, अर्जदार ही दि.२०/०५/२०२२ रोजी माहेरी गेली, त्यानंतर ती पुन्हा नांदायला आली नाही. अर्जदार ही कॉलेजमध्ये प्रोफेसर असल्यामुळे अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार लग्नाच्या दोन महिन्यानंतर त्यांचे आईच्या

बिल्डींगच्या बाजूचा फलॅट भाडयाने घेतला होता. परंतू अर्जदार हिच्या स्वभावात बदल झाला असून ती सतत तिच्या आईकडे ये–जा करीत असल्याकारणामुळे सामनेवाल्याकडे दूर्लक्ष करीत होती. सामनेवाल्याची आर्थीक परिस्थिती नसतांना देखील अर्जदाराचे सगळे हट्ट सामनेवाला यांनी कर्जबाजारी होवून पुर्ण केले होते. अर्जदार ही तिचा महिन्याचा सर्व पगार तिचया माहेरी देत असे.

०९. अर्जदाराने तिच्या पगारातून संसाराला कधीही हातभार लावला नाही. अर्जदार ही सतत तिच्या आईकडेच राहत होती, ती सामनेवाल्याला वेळेवर जेवण सुद्धा देत नव्हती. अर्जदाराने सामनेवाला क्र.०१ यांच्या आई–वडीलांना खुप वाईट शब्दांमध्ये वारंवार हिणवले आहे. तसेच, उलटसुलट बोलून सामनेवाला यांस नाहक शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. अर्जदार मुलाला सहा महिने झाले तरी सामनेवाल्याच्या घरी मौजे रातवड येथे सतत विनवण्या करुन देखील आली नाही. सामनेवाला हा अर्जदार हिस सांभाळण्यास व नांदवण्यास तयार आहे. सामनेवाला हा कर्जबाजारी झाल्याने त्याला त्याचा फलॅट विकावा लागला होता. सामनेवाला यांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे. सामनेवाला वारंवार अर्जदाराला नांदवण्यास तयार असतांना देखील अर्जदार ही सामनेवाल्यासोबत नांदायला तयार नाही. यावरुन अर्जदार हिला सामनेवाल्यासोबत नांदायचे नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे तिचा अर्ज फेटाळण्यात यावा.

१०. अर्जदार क्र.०१ यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र.०१ यांच्या वकीलांनी लेखी युक्तीवाद नि.क्र.२४ कडे दाखल केला आहे, तसेच मालमत्ता विवरण

पत्रक नि.क्र.२३ कडे दाखल केले आहे. कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ही महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ०२. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**<u>मुद्दे क्र.०१ करीता :–</u>**

११. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांचा विवाह दि.२१.०२.२०२१ रोजी झालेला असून सदर विवाह संबंधातून त्यांना एक मूलगा नामे अयांश वय वर्ष ०१ आहे. सामनेवाला यांनी अर्जदार व त्यांचा विवाह मान्य केलेला आहे. परंतू अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, ती तिच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या आई–वडीलांवर अवलंबून आहे.

१२. सामनेवाला क्र.०१ हे सुदर्शन कंपनीमध्ये काम करीत असून त्यांना दरमहा रु.२५,०००/– उत्पन्न आहे. उलटपक्षी अर्जदार ही सुशिक्षीत असून ती प्रोफेसर आहे. सामनेवाला यांनी असा युक्तीवाद केला आहे की, मा. जिल्हा न्यायाधीश माणगांव या न्यायालयामध्ये दावा चालू असल्यामुळे सामनेवाला यांना न्यायालयात हजर रहावे लागत

असल्यामुळे त्यांना कामावरुन सतत सुट्टी घ्यावी लागत असे. या कारणास्तव सामनेवाला यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे, त्यामुळे ते बेरोजगार झाले आहेत. सामनेवाला यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला यांचा खर्च त्यांचा मोठा भाउ करीत आहे. सामनेवाला यांनी फ्लॅट खरेदीसाठी घेतलेले सोने तारण कर्ज देखील अद्याप फेडलेले नाही.

१३. अर्जदाराच्या कथनांवरुन असे दिसून येते की अर्जदार ही तिच्या मुलासह तिच्या आई–वडीलांकडे राहत आहे. सामनेवाला यांनी अर्जदारास शारीरीक व मानसिक छळ केला आहे. याउलट सामनेवाला यांच्या अर्जातील कथनांवरुन अर्जदार तिच्या मर्जीने घर सोडून गेलेली आहे. परंतु अर्जदार हिस सामनेवाला यांनी माहेरी निघून जाण्यास भाग पाडले अगर ती स्वतःहून माहेरी आली या सर्व बाबी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर सिध्द होणार आहेत.

१४. अर्जदाराने नि.क्र.२५ कडे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सामनेवाला क्र.०१ यांनी नि.क्र.२३ कडे त्यांचे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने सामनेवाला हा महिन्याला किती कमावतो हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही.

१५. अर्जदार ही तिच्या मुलासह माहेरी आई–वडीलांकडे राहत असल्याचे अर्जातील कथनांवरुन लक्षात येते. अर्जदार ही सामनेवाला क्र.०१ याची कायदेशिर पत्नी

आहे त्यामुळे सामनेवाला क्र.०१ अर्जदाराची व त्यांच्या मुलांची जबाबदारी कोणत्याही परिस्थीतीमध्ये नाकारू शकत नाही. पत्नी व मुलांची जबाबदारी घेणे हे सामने वाला याचे कर्तव्य आहे. सामनेवाला हा महिना रक्कम रु.२५,०००/- कमवतो हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतू अर्जदार क्र.०१ व ०२ यांची संपूर्ण जबाबदारी ही सामनेवाला क्र.०१ ची आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.०१ हा अर्जदार हिस अंतरिम पोटगी देणे लागतो. त्यामुळे मी मुद्या क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्या क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ हिस दरमहा रक्कम रु. २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) एवढी अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखे पासून ते मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत दयावेत.

३. सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार क्र. ०२ अयांश संदिप शिंदे यास दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) एवढी रक्कम आर्थिक अंतरिम सहाय्य अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

४. या आदेशाची प्रत अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांना मोफत देण्यात यावी.

--स्वाक्षरी--

स्थळ : रोहा, (एम. सी. हासगे)
दि.०६.०३.२०२५ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.